**<u>ठळक बातम्या</u>**

- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नायगाव इथल्या सावित्रीबाई स्मारकाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन

- महानगरपालिका निवडणुकीसाठी माघारीनंतर मुंबईत १ हजार ७२९ उमेदवार रिंगणात

- राज्याच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त/ नवे महासंचालक सदानंद दाते यांनी स्वीकारला पदभार

- छत्तीसगड मध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकूण १४ माओवादी ठार

**आणि**

- अभाविपचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक मोडक यांचं निधन

**<><><><><>**

स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. सावित्रीबाई फुले यांनी सेवा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजात परिवर्तन घडवण्यासाठी आपलं संपूर्ण आयुष्य समर्पित केलं. समता, न्याय आणि करुणा या मूल्यांप्रती त्यांची अतूट बांधिलकी होती, समाजातल्या वंचित आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी त्यांनी केलेलं कार्य प्रेरणादायी आहे, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या, भारतातल्या पहिल्या महिला शिक्षिका 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' यांना जयंतीदिनी कोटी कोटी वंदन अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिवादन केलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही सावित्रीबाई फुले यांना आदरांजली वाहिली आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त आज विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. **मुंबईत** महाराष्ट्र लोकभवन इथं सावित्रीबाईंच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आलं. **नाशिक**च्या आरोग्य विज्ञान विद्यापीठात सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली तर **बीड** शहरात अभिवादन रॅली काढण्यात आली. **नांदेड** इथंही जिल्हाधिकारी कार्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. **परभणीत** पूर्णा तालुक्यात विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले आणि जिजामाता यांच्या वेशभूषा साकारून त्यांचा जीवनपट सादर केला.

**<><><><><>**

ज्या व्यक्तिमत्त्वांकडे पाहून आपल्याला प्रेरणा मिळते, अशा थोर व्यक्तींमध्ये सावित्रीबाई फुले यांचं नाव अतिशय महत्त्वाचं आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज काढले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सातारा जिल्ह्यातल्या नायगाव या त्यांच्या जन्मगावी त्यांच्या स्मारकाचं आणि महिला प्रशिक्षण केंद्राचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते.

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस***

इथं फक्त स्मारक नाही, तर महिलांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रही इथं उभारलं जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. नायगावचं नाव बदलून सावित्राबाई फुले यांच्या नावावरून ठेवायचा निर्णय जर इथल्या ग्रामसभेनं घेतला, तर विनाविलंब त्याला मान्यता देऊ, असं आश्वासनही त्यांनी दिलं. विधानपरिषदेचे

सभापती राम शिंदे, राज्याचे मंत्री छगन भुजबळ, साताऱ्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई, जयकुमार गोरे आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत काल संपली. आज निवडणूक चिन्हांचं वाटप झाल्यानंतर, अंतिम उमेदवार यादी जाहीर होणार आहे. येत्या १५जानेवारीला मतदान, तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. काल अनेक प्रभागांमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले, राज्यात महायुतीचे एकंदर ६८ उमेदवार बिनविरोध निवडले गेल्याचं भाजपाने म्हटलं आहे. यात ४४ उमेदवार भाजपाचे तर २२ शिवसेनेचे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे २ उमेदवार बिनविरोध आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या २२७ जागांसाठी १ हजार ७२९ उमेदवार नशीब आजमावत आहेत. ४५३ उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. ठाणे महानगरपालिकेत १३१ जागांसाठी २६९ उमेदवारांनी नामांकन मागे घेतल्यानं ६४९ उमेदवार रिंगणात उरले आहेत. पुण्यात माघारीच्या मुदतीत ९६९ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने महानगरपालिकेच्या १६५ जागांसाठी एकूण एक हजार १६५ उमेदवार रिंगणात उरले आहेत. अर्ज माघारीनंतर भाजपाचे २ उमेदवार बिनविरोध निवडले गेले आहेत. छत्रपती संभाजीनगरमधे ५५४ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यानं ११५ जागांसाठी ८५९ उमेदवार रिंगणात उरले आहेत. लातूरमधे ३५९ उमेदवार मैदानात आहेत.

**<><><><><>**

राज्याच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आज सेवानिवृत्त झाल्या. पोलीस दलात साडे ३७ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या शुक्ला यांना मुंबईत भोईवाडा इथल्या पोलीस मैदानात मानवंदना देण्यात आली. त्यानंतर

शुक्ला यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

राज्याचे नवनियुक्त पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी आज रश्मी शुक्ला यांच्याकडून आपल्या पदाचा कार्यभार हाती घेतला. तत्पूर्वी त्यांनीही मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करत मुख्यमंत्र्यांनी त्यांना कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

दहशतवाद विरोधी पथक, एनआयए, सीबीआय, सीआरपीएफ अशा महत्त्वाच्या संस्थांमधल्या कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेले सदानंद दाते भारतीय पोलीस सेवेच्या १९९० च्या तुकडीतले अधिकारी आहेत.

**<><><><><>**

छत्तीसगड मध्ये आज दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकूण १४ माओवादी मारले गेले. सुरक्षा दलांच्या नक्षलवाद विरोधी मोहिमेला वर्षाच्या सुरुवातीलाच आलेलं हे मोठं यश मानलं जात आहे. यापैकी बस्तर भागात बिजापूर जिल्ह्यात दोन आणि सुकमा जिल्ह्यात १२ माओवादी मारले गेले. बिजापूर मध्ये बासुगुडा भागात माओवादी असल्याची माहिती मिळताच पोलिसांचं पथक तिथं तातडीनं रवाना झालं. त्यानंतर गगनपल्ली गावाजवळ दोन्ही बाजूंनी झालेल्या गोळीबारात दोन माओवादी मारले गेले. त्याचप्रमाणे सुकमा जिल्ह्यातही पोलिसांच्या कारवाईत १२ जण मारले गेले. सुरक्षा दलांनी चकमकीच्या ठिकाणाहून सर्व माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. याशिवाय, घटनास्थळावरून एक एके-४७ रायफल, एक एसएलआर रायफल आणि इतर शस्त्रंही जप्त करण्यात आली आहेत.

**<><><><><>**

देशात यंदा सुमारे तीन कोटी पन्नास लाख टन साखरेचं उत्पादन होण्याचा अंदाज असून ३१ डिसेंबरअखेर ११८ लाख टन साखर तयार झाली आहे, अशी माहीती राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी दिली. महाराष्ट्रात सर्वाधिक सुमारे ४९ लाख टन आणि त्यानंतर उत्तर प्रदेशात ३५ लाख टन साखर तयार झाली आहे.

<><><><><>

२०२६ च्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेसाठी कोलकाता नाईट रायडर्स संघाने बांगलादेशी खेळाडू मुस्तफिजूर रहमान याला संघातून वगळावं असं बीसीसीआय अर्थात भारत क्रिकेट नियामक मंडळाने सांगितलं आहे. केकेआरने रहमानला आयपीएलच्या लिलावात ९ कोटी वीस लाख रुपयांना खरेदी केलं आहे. बांगलादेशात एका हिंदू तरुणाची हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशी खेळाडूला आयपीएलमधे घेण्यावरून वाद सुरू झाला आहे. त्यामुळे बीसीसीआयने बांगलादेशी खेळाडूला वगळण्यास सांगितलं आहे, या खेळाडूच्या ऐवजी दुसरा खेळाडू निवडण्याची संधी केकेआर संघाला मिळणार आहे.

<><><><><>

सातारा इथं सुरु असलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात आज कथाकथन, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कवयित्री अनुराधा पाटील यांचा बालकुमार वाचकांशी संवाद, आणि अमोल पालेकर यांच्या ऐवज या पुस्तकावर चर्चा होणार आहे. मराठी समाजाची विचारभ्रष्टता मराठी साहित्यात भयकथा, स्त्री चळवळीची ५० वर्षे, अभिजात दर्जानंतरची मराठी आदी विषयांवर परिसंवाद होणार आहे तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ज्येष्ठ लेखक, प्रकाशकांचे सत्कार होणार आहेत.

<><><><><>

भारत आणि बांगलादेश यांच्यात गेल्या वर्षी नियोजित असलेली मर्यादित षटकांच्या सामन्यांची क्रिकेट मालिका यावर्षी सप्टेंबर महिन्यात होईल, असं बांगलादेश क्रिकेट मंडळाने सांगितलं आहे. मात्र याचं वेळापत्रक निश्चित नाही.

**<><><><><>**

ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ, अखिलभारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक मोडक यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. गेलं वर्षभर ते कर्करोगाशी झुंज देत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते समर्पित कार्यकर्ते होते. राज्यातल्या विविध नामांकित महाविद्यालयांमधे अध्यापन क्षेत्रात ठसा उमटवणारे डॉ मोडक सोविएत रशियासंदर्भातले तज्ज्ञ होते. बिलासपूर इथल्या गुरु घासीदास केंद्रीय विद्यापीठाचे कुलपती म्हणून त्यांनी काम केलं होतं. विविध विषयांवरची ४० पुस्तकं त्यांनी लिहीली होती. १९९४ ते २००६ अशी सलग १२ वर्षं त्यांनी विधानपरिषदेत पदवीधर मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशोक मोडक यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं असून आदरांजली वाहिली आहे. विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी मोडक यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**